ISSN (e): 2250 – 3005 || Volume, 15 ||Issue, 11||November-2025 ||
International Journal of Computational Engineering Research (IJCER)

# अभियांत्रिकी महाविद्यालय ग्रंथालयामध्ये नियतकालिकांचा

## होणारा वापर: अडचणी आणि सुधारणा

**(Problems of Improvements In The Use of Periodical in Engineering College Libraries)**

**अडसुळे पल्लवी पांडूरंग**
संशोधक
स्वा.रा.ती.म.वि. नांदेड.

**प्रा. डॉ. ढाकणे बालाजी निवृत्तीराव**
प्राचार्य, कै. सौ. शेषाबाई सिताराम मुंढे
कला महाविद्यालय, गंगाखेड, जि. परभणी

***सार :-***
*आधुनिक काळामध्ये ज्ञानाचा परिस्फोट झाल्याने वेगवेगळ्या माध्यमांतून भरघोस क्रांती प्रत्येक क्षेत्रात घडून येत आहे. सखोल, अचूक आणि तत्पर ज्ञान वेळेत मिळण्यासाठी प्रत्येक ग्रंथालय कटिबद्ध असते आणि या माध्यमातून नियतकालिके महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. ज्ञानाच्या परिपूर्णतेसाठी नियतकालिके महत्वाची आहेत. विद्यार्थी, तज्ञ, अभ्यासक, संशोधक त्यांच्या शैक्षणिक संशोधनात नियतकालिकाचा उपयोग सर्वाधिक करतात. सदरील संशोधनाचा उद्देश विद्यार्थी संशोधक यांचा अभियांत्रिकी ग्रंथालयामधील नियतकालिक वापरासंबंधी अभ्यास करणे हा आहे. याचा वापर कसा, कितपत महत्त्वपूर्ण गरजा ही नियतकालिके पुरवतात यासंबंधी सखोल विवेचन केले आहे.*

***संज्ञा:*** *नियतकालिक, अभियांत्रिकी ग्रंथालय.*

Date of Submission: 01-11-2025 | Date of acceptance: 08-11-2025

**प्रस्तावना :-**

ग्रंथालये ही सेवाभावी संस्था आहेत. यादवारे विविध सेवा प्रदान केल्या जातात. ग्रंथालयाचे व्यवस्थापन, कार्यपद्धती वाचनसाहित्य, वाचक व ग्रंथालय सेवा या सर्व घटकामध्ये समन्वय साधणे महत्त्वपूर्ण आहे. वाचकांना वेळेवर अद्ययावत माहिती नियतकालिकाच्या माध्यमातून पुरविली जाते.

विषयाशी संबंधित तत्पर आटोपशीर प्राथमिक मूळ स्त्रोतातून मिळणारी माहिती या नियतकालिकांमध्ये असते. म्हणूनच उपभोक्त्यांना महत्त्वपूर्ण वाटते.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1) नियतकालिकाचे महत्त्व जाणून घेणे.
2) नियतकालिकाचा उपभोक्त्यावर होणारा परिणाम जाणून घेणे.
3) नियतकालिक व्यवस्थापनात येणा-या समस्या शोधणे.
4) नियतकालिक व्यवस्थापनाबाबत उपाययोजना सुचवणे.

**संशोधन प्रश्न :**

1) नियतकालिके उपयुक्त आहेत काय?
2) नियतकालिक व्यवस्थापनात समस्या जाणवतात काय?
3) उपभोक्ता विषयनिहाय नियतकालिकाचा वापर करतात काय?

4) नियतकालिक व्यवस्थापनातील उपाययोजना कोणत्या सुचवता येतील?

**संशोधन पद्धती :**

संशोधनासाठी वर्णनात्मक आणि सर्वेक्षणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**माहिती संकलनाची साधने :**

माहिती संकलनासाठी प्रश्नावली आणि प्रत्यक्ष निरीक्षण तंत्र वापरण्यात आले आहे.

नमुना - 100 ग्रंथपाल
100 विद्यार्थी

**माहिती विश्लेषण :**

**अभियांत्रिकी नियतकालिके :**

ही नियतकालिके या क्षेत्रातील होणा-या नवनविन घडामोडी, तंत्रज्ञान व शोध इत्यादींची माहिती देतात. यामध्ये विविध शाखांचा समावेश असतो. उदा. रासायनिक, संगणक, विद्युत, स्थापत्य, अभियांत्रिकी इत्यादींचा समावेश होतो. यामध्ये जगातील अभियांत्रिकी संस्थांकडून प्रकाशित होणारे शोधनिबंध, परिषदेतील लेख, उद्योग जगतातील माहितीचा समावेश असतो.

**अभियांत्रिकी नियतकालिकांचे प्रकार :**

**1) जागतिक नियतकालिके :**

आंतरराष्ट्रीय स्तरावरील शोधनिबंध, तंत्रज्ञान विषयक माहितीचा समावेश या नियतकालिकात असतो.

उदा. 1. केमिकल ॲण्ड अभियांत्रिकी न्यूज
2. अमेरिकन इन्स्टिट्युट ऑफ केमिकल इंजिनिअर्स जर्नल

**2) संस्था - आधारित नियतकालिके :**

याची निर्मिती व्यावसायिक संस्था / विद्यापीठाद्वारे केली जाते. ज्यामध्ये अभियांत्रिकीच्या विविध क्षेत्रातील नवनविन घडामोडीची माहिती यात दिली जाते.

उदा. इन्स्टिट्युट ऑफ इंजिनीअर्स (इंडिया) जर्नल.

**3) विषय - नियतकालिके :**

अभियांत्रिकीच्या विषयनिहाय शाखांचा समावेश या नियतकालिकात होतो.

उदा.- केमिकल इंजिनिअरींग वर्ल्ड
अमेरिकन इन्स्टिट्युट ऑफ केमिकल इंजिनिअर्स जर्नल
यांत्रिकी अभियांत्रिकी नियतकालिके आणि विद्युत अभियांत्रिकी नियतकालिके.

**विद्यार्थ्यांसाठी प्रश्न :**

1) कोणते नियतकालिक सर्वाधिक वापरता?

[ई-जर्नल / प्रिंट जर्नल]

2) नियतकालिक वापरताना अडचणी येतात का?

[होय / कधी-कधी / कधीच नाही)

3) नियतकालिक अध्यापनात सोयीस्कर आहे का?

[होय / नाही / ब-यापैकी / खूप उपयुक्त]

4) नियतकालिक किती वेळा वापरता?

[दररोज / आठवड्यातून / महिन्यातून / कधीतरी]

5) सर्वाधिक कोणते नियतकालिक वापरता?

[जागतिक / संख्या आधारीत / विषय नियतकालिके]

**ग्रंथपालांसाठी प्रश्न :**

1) नियतकालिक व्यवस्थापनात अडचणी जाणवतात का?

[होय / नाही / कधी-कधी / कधीच नाही]

2) नियतकालिक वापराचा उद्देश कोणता?

[ज्ञान अद्ययावत / संशोधन उद्देश / मनोरंजन / अध्यापन]

3) नियतकालिक सुविधा वाढवण्याचे उपाय कोणते?

[आंतरग्रंथालयीन कर्ज / प्रकाशकाकडून मागणी / ग्रंथालय स्वचालन / देवघेव]


4) नियतकालिके वाढवण्यासाठी कोणते उपक्रम घ्याल?

[माहिती साक्षरता / परिसंवाद / कार्यशाळा / चर्चासत्र कार्यक्रम]

**डेटा विश्लेषण :-**


**विद्यार्थी संशोधक वर्ग**

| अ. क्र. | नियतकालिक प्रकार | दररोज | आठवड्यातून | महिन्यातून | कधीतरी | एकूण (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | जागतिक | 50 | 10 | 10 | 0 | 70% |
| 2 | संख्याधारित | 40 | 5 | 5 | 10 | 60% |
| 3 | विषय | 60 | 0 | 5 | 5 | 70% |



**ग्रंथपाल वर्ग :-**

| अ. क्र. | नियतकालिक प्रकार | दररोज | आठवड्यातून | महिन्यातून | कधीतरी | एकूण (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | जागतिक | 20 | 20 | 20 | 20 | 80% |
| 2 | संख्याधारित | 60 | 10 | 20 | 0 | 90% |
| 3 | विषय | 40 | 10 | 20 | 20 | 90% |




**निष्कर्ष :-**

1) विद्यार्थी जागतिक नियतकालिके सर्वात जास्त वापरतात; ग्रंथपाल संख्या आधारित नियतकालिक सर्वात जास्त वापरतात.
2) 90% विद्यार्थी विषय नियतकालिक उपयुक्त मानतात तर संख्याधारित नियतकालिकांची संख्या वाढवावी लागते.
3) ग्रंथपालांना जागतिक नियतकालिक वाढवण्याची गरज आहे.
4) चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा आयोजित करणे आवश्यक आहे.

**शिफारशी :**

1) विद्यार्थी, अभ्यासक, संशोधकांसाठी माहिती साक्षरता कौशल्ये विकसित करणे.
2) उपभोक्त्यांकरिता अभिमुखता कार्यक्रम आयोजित करणे.
3) ई-संसाधनांच्या कार्यशाळा, प्रशिक्षण, चर्चासत्र, परिसंवाद आयोजित करणे.
4) ई-नियतकालिक आणि पारंपरिक नियतकालिकांच्या वापरासंबंधी जागरूकता निर्माण करणे.

**सारांश :-**

सदरील संशोधनावरून हे स्पष्ट होते की, नियतकालिक वापराबाबत नवनविन तंत्रज्ञानाचा अवलंब ग्रंथालयात होणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्रंथपाल व ग्रंथालयीन कर्मचा-यांना प्रशिक्षण गरजेचे आहे.

**संदर्भ :-**

1) मित्तल आर. एस. (1983) : ग्रंथालय प्रशासन सिद्धांत, मेट्रोपॉलिटन बुक कॉर्पोरेशन, नवी दिल्ली,
2) फारुकी, खालिद के. (1997) : ग्रंथालयामधील संग्रह, अनमोल प्रकाशन, नवी दिल्ली,
3) अग्रवाल विभूती (2000) : लायब्ररी नेटवर्किंग, आव्हाने आणि संधी, राजपुत प्रकाशन, दिल्ली.
4) श्यामा बाळकृष्णन (2001) : ग्रंथालय व्यवस्थापन, कॉमनवेल्थ प्रकाशन, नवी दिल्ली.
5) नाईक, एम. रुपसिंग (2013) : विद्यापीठ ग्रंथालयामध्ये इलेक्ट्रॉनिक माहिती संसाधने, नवी दिल्ली.
6) चौहान के. आणि महापात्रा (2013) : लायब्ररी आणि माहिती विज्ञान, नवी दिल्ली.
7) रैना रोशन आणि गुप्ता व्ही. पी. (1988) : स्वयंचलित नियतकालिकांचे संपादन आणि नियंत्रण.